# जालना जिल्ह्यातील केळी लागवड क्षेत्राचा भौगोलिक अभ्यास

**किशोर अंकुशराव जावळे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. विजय बैसाने**
संशोधक मार्गदर्शक
भूगोल विभाग प्रमुख
दगडोजीराव देशमुख कला वाणिज्य विज्ञान
महाविद्यालय, वाळुज, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद

● **सारांश :**

असे म्हटले जाते आरोग्यम् धन संपदा ! म्हणजे निरोगी आरोग्य हेच आपले खरे धन आहे. निरोगी आरोग्यासठी आपल्या जीवनात फळांचे अत्यंत महत्व आहे. यामुळेच फळांची मागणी बाजारात वाढलेली आहे. फळांना बाजारात मूल्य अधिक मिळत आहे. यामुळेच शेतकरी फळबाग लागवडीकडे वळत आहे. अन्नधान्य, मळ्याची शेती याच बरोबर फळबाग शेतीसही आर्थिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञान व सिंचनाच्या सहाय्याने फळबाग लागवड क्षेत्र व उत्पादनात वाढ होत आहे. भारतातात अंबा, फणस, चिकू, सितापळ, पेरू, बोर, चिंच, केळी, द्राक्ष, मोसंबी, संत्रा, डाळींब, पपई इत्यादी मुख्य फळांचे उत्पादन घेतले जाते. फळांवर विविध प्रक्रिया उद्योगातून जाम, जेली, वेफर्स, ज्युस, शित पेय, इत्यादी उत्पादने घेतली जातात. केळी या फळावर प्रक्रिया करून जाम, जेली, वेफर्स इत्यादी उत्पादने घेतली जातात. त्यामुळे केळी या पिकाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्याचबरोबर भारतामध्ये धार्मिक सण उत्सवामध्ये, पुजेसाठी केळीचे व केळीच्या पानांचे अनन्यसाधारण महत्त्व दिसून येते. म्हणून केळीचे फळ मानवास अत्यंत उपयुक्त असल्याचे दिसून येते. त्यामुळे केळी या फळ पिकाचे उत्पादन शेतकरी घेत आहे. महाराष्टातही केळी लागवडक्षेत्र असून उत्पादन घेतले जाते. जळगाव जिल्हा लागवड क्षेत्र व उत्पादनात आघाडीवर आहे. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, जालना इत्यादी जिल्ह्यातही केळीची लागवड केली जाते.

● **बीज संज्ञा :**

फळपिक, केळी लागवड क्षेत्र

● **प्रस्तावना :**

महाराष्टात केळी या फळास मागणी आहे. मागणी जास्त असल्यामुळे शेतकरी केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेत आहे. जळगाव जिल्हा हा केळी उत्पादनात अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातून महाराष्टाच्या एकूण उत्पादनाच्या ५०% उत्पादने केळीचे घेतले जाते. जालना जिल्ह्यातही फळबाग लागवड क्षेत्र असून केळीचे उत्पादन घेतले जाते. जालना जिल्ह्यात संत्रा, मोसंबी, डाळिंब, द्राक्ष, अंबा या फळबागासोबतच केळीचेही लागवड केली जाते. म्हणूनच या शोधनिबंधात जालना जिल्ह्यातील केळी लागवड क्षेत्राचा अभ्यास करावयाचा उपयुक्त ठरतो.

- **अभ्यास क्षेत्र :**

जालना जिल्हा १९.१ ते २०.३ या उत्तर अक्षांस व ७५.४ रेखांश ते ७६.४ या पूर्व रेखांशामध्ये बसलेला आहे. हा मराठवाड्यातील महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे. तरी हा जिल्हा विकासाच्या दृष्टीने मागासलेला दिसून येतो. जिल्ह्यात पर्जन्याचे प्रमाणे ६५० ते ७०० मीमी एवढे आढळते. जिल्ह्याचे तापमान किमान १० ते १२$^{\circ}$से. व कमाल तापमाण ४० ते ४२$^{\circ}$से. इतके आहे. जिल्ह्यात गोदावरी, दुधना, पुर्णा, कुंडलीका, गलाटी, खेळणा, धामणा, गिरजा, जीवरेखा या नद्या आहेत. जिल्ह्यात वनांचे प्रमाण खुच कमी आहे. जिल्ह्यातील जमिन सुपिक व काळी आहे. जालना, बदनापूर, भोकरदन व जाफ्राबाद या तालुक्यामध्ये जमिन हलक्या प्रतिची व मुरमाड आहे. जिल्ह्यातील दक्षिण व दक्षिणपूर्व भागातील अंबड, घनसावंगी, परतूर व मंठा या तालुक्यांमध्ये जमिन काळी व सुपीक आहे.

- **उद्दिष्ट्ये :**

जालना जिल्ह्यातील फळबाग लागवड क्षेत्राचा अभ्यास करणे.

जालना जिल्ह्यातील केळी लागवड क्षेत्राचा अभ्यास करणे.

- **माहिती संकलन व संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीय स्वरूपाची माहिती संकलित केली आहे. प्रस्तुत माहितीचे विश्लेषण करण्यासाठी विविध तंत्राचा वापर केला आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी तक्ते, आलेख, आकृती यांचा वापर करण्यात आला.

- **विषय विवेचन :**

भारतात क्षेत्राच्या व उत्पादनच्या दृष्टीने अंब्याच्या खालोखाल केळीचा क्रमांक लागतो. केळीच्या उत्पादनात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतात सुमारे २ लाख २० हजार हेक्टर क्षेत्र केळीच्या लागवडीखाली आहे. महाराष्ट्रात ४४ हजार हेक्टर क्षेत्र केळीच्या लागवडीखाली आहे. महाराष्ट्राचा उत्पादनक्षेत्राच्या दृष्टीने तिसरा क्रमांक लागतो. तर देशांतर्गत निर्यातीत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सर्वाधिक लागवड क्षेत्र हे जळगाव जिल्ह्यात आहे. जालना जिल्ह्यात इतर फळबाग लागवड क्षेत्राप्रमाणेच केळीचीही लागवड केली जाते.

- **उपयोग :**

केळीमध्ये १८ ते २०% शर्करी, स्निग्ध पदार्थ, कॅलशिअम फॉस्पोरस, लोह खनिज, ब जीवनसत्त्व यांचा अंतरभाव असतो. कच्या फळात टॅनीन व स्टार्च विपूल प्रमाणात असते. यामुळे केळी हे फळ आरोग्यदायी आहे.

- **हवामान :**

केळी हे उष्णकटिबंधिय फळ असून त्यात साधारत: उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. साधारत: १५ ते ४० डिग्रीसेंटीग्रेट पर्यंतचे तापमाण यो पिकास चांगले मानते.

- **जमिन :**

कसदार, गाळाची सुपिक, भूसभूसीत, मध्यम काळी, पाण्याचा निचरा होणारी जमिन या पिकास मानवते.

- **जालना जिल्ह्यातील फळबाग लागवड क्षेत्र :**

जालना हा मराठवाड्यातील महत्त्वाचा जिल्हा असून या जिल्ह्यात शेतीमध्ये विविध फळबागेची लागवड केलेली आहे. यामध्ये अंबा, द्राक्ष, केळी, संत्रा, मोसंबी, डाळींब इत्यादी फळ पिकांची लागवड केलेली आहे.

तक्ता क्र. १
जालना जिल्ह्यातील फळबाग लागवड
एकूण क्षेत्र हे. मध्ये संदर्भ वर्ष २०१६-१७

| अ.क्र. | तालुका | फळपिकाखालील क्षेत्र .हे. |
|---|---|---|
| १ | भोकरदन | २५०१६.०० |
| २ | जाफ्राबाद | १६४६.०० |
| ३ | जालना | ४७६७.०० |
| ४ | बदनापूर | २२७१.०० |
| ५ | अंबड | ६८६०.०० |
| ६ | घनसावंगी | ५९३९.०० |
| ७ | परतूर | २३२०.०० |
| ८ | मंठा | २१२२.८० |
| | **एकूण** | **२८४४१.८०** |

**स्त्रोत :** जालना जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६-१७

तक्ता क्र. १ च्या आकडेवारीवरून जालना जिल्ह्यातील एकूण फळ पिकांखालील क्षेत्रे २८४४१.८० हेक्टर असून हे संपुर्ण क्षेत्र ओलिताखालील आहे. सर्वात जास्त फळ पिकाखालील क्षेत्र हे अंबड तालुक्यात असून ते ६८६० हेक्टर ऐवढे आहे. त्या खालोखाल घनसावंगी तालुक्यात ५९३९ हे., जालना ४७६७ हे., भोरकदन २५१६ हे., परतूर २३२० हे., बदनापूर २२१७ हे., मंठा २१२२ हे. सगळ्यात कमी जाफ्राबाद तालुका १६४६ हे. इतके आहे.

तक्ता क्र. २

**जालना जिल्ह्यातील केळी लागवड क्षेत्र**

संदर्भ वर्ष २०१६-१७

| अ.क्र. | तालुका | केळी लागवड क्षेत्र हे. |
|---|---|---|
| १ | भोकरदन | ८१.०० |
| २ | जाफ्राबाद | २२.०० |
| ३ | जालना | ९७.०० |
| ४ | बदनापूर | १२१.०० |
| ५ | अंबड | १२४.०० |
| ६ | घनसावंगी | १२४.०० |
| ७ | परतूर | ७२.०० |
| ८ | मंठा | ८६.८० |
| | **एकूण** | **७२७.८०** |

**स्त्रोत :** जालना जिल्हा सलामाजिक आर्थिक समालोचन २०१६-१७

तक्ता क्र. २ च्या आकडेवारी नुसार जालना जिल्ह्यातील केळी पिक लागवडीखालील क्षेत्र हे ७२७.८० हे. असुन अंबड व घनसावंगी तालुक्यात सगळ्यात जास्त १२४ हे., बदनापूर १२१ हे., जालना ९७ हे., मंठा ८६.८० हे., भोकरदन ८१ हे., परतूर ७२ हे., सर्वात कमी जाफ्राबाद २२ हे. इतकी लागवड आहे.

● **निष्कर्ष :**

एकंदरीत वरील आकडेवारीवरून व विश्लेषणावरून असे दिसून येते की, जालना जिल्ह्यात ईतर फळपिकाच्या तुलनेने केळी लागवडीचे क्षेत्र कमी असल्याचे दिसून येते. जालना जिह्यातील एकूण फळबाग क्षेत्र २८४४१.८० हेक्टर ऐवढे असल्याचे दिसून येते. तर जिल्ह्यात केळी लागवड क्षेत्र केवळ ७२७.८० हे. इतकेच आहे. केळीचे आर्थिक महत्त्व पाहता जालना जिल्ह्यात केळी लागवड क्षेत्र वाढण्याची आवश्यकता दिसून येते. त्यासाठी खालील शिफारसी करण्यात आलेल्या आहे.

● **शिफारसी :**

१) केळी लागवड क्षेत्र वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे.
२) सिंचन सुविधा वाढवावे.
३) केळी पिकाचे आर्थिक फायदे शेतकऱ्यांना सांगावे.
४) केळीवर आधारीत प्रक्रिया उद्योगाचे प्रशिक्षण द्यावे.
५) शासकीय मदत शेतकऱ्यांना केळी लागवडीसाठी देण्यात यावी.

● **संदर्भ :**

१) जालना जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन - २०१६-१७
२) कृषि विभाग महाराष्ट्र शासन
३) कृषि भूगोल - डॉ. डी.एस. सूर्यवंशी - निराली प्रकाशन
४) कृषि भूगोल - डॉ. अरून कुंभारे - पायल पब्लिकेशन
5) Systematic Agricultural Geography-Majid Husain – Rawat Publications, Jaipur and New Delhi.